**अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील गट-अ ते गट-ड मधील विविध संवर्गातील पदांवर शारीरिकदृष्ट्या अपंग उमेदवारांकरिता आरक्षण विहीत करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक :आयडीसी २०१०/(७६६)/उद्योग १४

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १३/१/२०११.

संदर्भ :-१) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (क्र.१/१९९६).

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०९८/प्र.क्र.१२/ १६-अ, दि. २ मे, १९९८.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९८/ प्र.क्र.३९/ ९८ /१६-अ, दि.१६ जून, २००१.

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग १००१/६१/ प्र.क्र.३६/ २००२/१६-अ, दि. १० मे, २००२

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग १००३/ प्र.क्र.१२७/ २००३/१६-अ, दि. ६ मे, २००४

६) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आयडीसी १००५/ (१०२३८)/उ-१४, दि. २९ जुलै, २००८.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, न्यायाप्र-२००९/ प्र.क्र.९/सुधार- ३, दि. ३ ऑगस्ट, २०१०.

**<u>प्रस्तावना :</u>**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ मध्ये शासकीय/ निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ % पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट-अ" ते "गट-ड" मधील विविध संवर्गातील पदांवरील नियुक्तीकरिता शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन त्यांची यादी प्रसिध्द केली आहे. सदर यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे संबंधित मंत्रालयीन विभागाने अपंगांसाठी निश्चित करावीत व तसे आदेश निर्गमित करावेत अशा सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्र. ७ येथील दि. ३ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये

निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील पदांकरिता शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी निश्चित करण्यात आलेल्या शारीरिक पात्रतेच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. प्रस्तुत प्रकरणी शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील आस्थापनांच्या पदांसाठी अपंग व्यक्तिकरिता आरक्षण विहित करण्याबाबत संदर्भ क्र. ६ येथील दि. २९ जुलै, २००८ च्या शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेले आदेश याव्दारे अधिक्रमित करण्यात येत असून, आता अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट-अ" ते "गट- ड " मधील विविध संवर्गातील पदांसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "१ ते ४" मध्ये नमूद केल्याप्रमाणे शारीरिकदृष्टया ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींकरिता पदे निश्चित करण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट- अ" ते "गट- ड " मधील विविध संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी सोबतच्या परिशिष्ट " १ ते ४" मध्ये दर्शविल्यानुसार अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग या अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी १ % या प्रमाणे एकूण ३ % आरक्षण ठेवून नियुक्ती करण्यात यावी.

३. अपंग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी संबंधित उमेदवाराने शारीरिक पात्रतेसंदर्भात विहित प्राधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. अपंग व्यक्तीची सरळसेवा भरतीने नियुक्ती करताना सदर उमेदवाराने सेवा प्रवेश नियमांनुसार विहित करण्यात आलेली अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

५. संदर्भ क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार सरळसेवेने नियुक्ती करताना अपंगांसाठी उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यत शिथिल करण्यात आली आहे.

६. उक्त अधिनियमाच्या कलम ३२ (बी) नुसार अपंग व्यक्तींसाठी योग्य ठरविलेल्या व सूट दिलेल्या पदांच्या यादीचा आढावा सदर आदेशाच्या दिनांकापासून प्रत्येक ३ वर्षानी घेऊन तंत्रज्ञानात झालेल्या विकासानुसार यादी अद्ययावत करावी.

७. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अपंग १००९/ प्र.क्र.२७६/०९/१६- अ, दि. १९ मार्च, २०१० मधील तरतुदीनुसार अपंगांची आरक्षित पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगांची पद भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र, निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घ्यावे.

८. या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट -अ" ते "गट- ड " मधील विविध संवर्गातील पदांवर अपंग व्यक्तींच्या नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेले आरक्षण एकाकी पदास लागू राहणार नाही, तसेच "गट- अ" व "गट- ब" मधील पदोन्नतीच्या पदासही लागू राहणार नाही.

९. हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र. न्यायाप्र २००९/प्र.क्र. ५/सुधार-३, दि. ३ ऑगस्ट, २०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०११३२१०१३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. ल. लखोटे)
**कार्यासन अधिकारी**

प्रति,

मा. मुख्य सचिव.
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई- ९३.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा.मंत्री (उद्योग)/ राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
* निबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई .
* निबंधक , उच्च न्यायालय, (अपीलेट साईड), मुंबई .
* प्रोथोनोटरी व सिनिअर मास्टर उच्च न्यायालय, मुंबई .
* प्रधान सचिव (विधान सभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
* प्रधान सचिव (विधान परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) महाराष्ट्र , मुंबई / नागपूर.
संचालक , सेवायोजन संचालनालय, मुंबई.
प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
निवडनस्ती ( उद्योग १४).
* (पत्राने)

<u>परिशिष्ट - " १ "</u>

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट -अ" संवर्गातील पदांसाठी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तिंकरिता निश्चित केलेल्या आरक्षणाचे विवरणपत्र.**

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| | **गट - अ** | | | |
| १. | महाव्यवस्थापक (मनुष्यबळ विकास) | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.OA.** |
| २. | महाव्यवस्थापक (परिव्यय आणि वित्त तथा अतिरिक्त मुख्य लेखाधिकारी) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **BL.OA.OL.** |
| ३. | मुख्य नियोजक | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ४. | महाव्यवस्थापक (विधी) | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **BL.OA.OL.** |
| ५. | जनसंपर्क अधिकारी | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **OA.OL.** |
| ६. | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार | अपात्र | अपात्र | अपात्र |
| ७. | महाव्यवस्थापक (वसाहत व्यवस्थापन) | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| ८. | महाव्यवस्थापक (पणन) | पात्र **LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| ९. | महाव्यवस्थापक (मावतं) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| १०. | वरिष्ठ नगररचनाकार | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ११. | सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| १२. | सहयोगी रचनाकार | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| १३. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.OA.** |
| १४. | कार्यकारी अभियंता (पर्या) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.OA.** |
| १५. | कार्यकारी अभियंता (विवयां) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| १६. | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र |
| १७. | विशेष कार्य अधिकारी (वित्त) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **BL.OA.OL.** |
| १८. | प्रादेशिक अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी/व्यवस्थापक (भूमी)/व्यवस्थापक | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.BL.OA.** |

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| | अधिकारी/व्यवस्थापक (भूमी)/व्यवस्थापक (भूमी-१)/ व्यवस्थापक (भूसंपादन -१)/ सहाय्यक उद्योग संचालक | | | OAL. |
| १९. | व्यवस्थापक (विधी) | पात्र B.LV. | अपात्र | पात्र OL.BL.OAL. |
| २०. | कार्यकारी सहाय्यक | पात्र B.LV. | पात्र H.H. | पात्र OL.BL.OA. |
| २१. | उप मुख्य लेखा अधिकारी/प्रकल्प व्यवस्थापक (वित्त)/ उप व्यवस्थापक (परिव्यय) | अपात्र | पात्र H.H. | पात्र BL.OA.OL. |
| २२. | विभागीय अग्निशमन अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र |
| २३. | उप अभियंता (पर्या) | अपात्र | पात्र H.H. | पात्र OL.OA. |
| २४. | उप अभियंता (स्थापत्य) | अपात्र | पात्र H.H. | पात्र OL.OA. |
| २५. | उप अभियंता (विवयां) | अपात्र | पात्र H.H. | पात्र OL. |
| २६. | उप वास्तुशास्त्रज्ञ | अपात्र | पात्र H.H. | पात्र OL. |
| २७. | उप रचनाकार | अपात्र | पात्र H.H. | पात्र OL. |

# परिशिष्ट - " २ "

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट -ब" संवर्गातील पदांसाठी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तिंकरिता निश्चित केलेल्या आरक्षणाचे विवरणपत्र.

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| | **गट - ब** | | | |
| १. | क्षेत्र व्यवस्थापक/ विकास अधिकारी/ आस्थापना अधिकारी/ वरिष्ठ अधिकारी (प्रकल्प व्यवस्थापक)/ उप व्यवस्थापक (कार्मिकी) | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.OA.BL.** |
| २. | कामगार कल्याण अधिकारी | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **OL.OA.BL.** |
| ३. | उप जनसंपर्क अधिकारी | पात्र **LV.** | अपात्र | पात्र **OL.OA.BL.** |
| ४. | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ५. | सहाय्यक रचनाकार | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ६. | सांख्यिकी अधिकारी | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.** |
| ७. | लेखा अधिकारी/ अंतर्गत लेखा परिक्षक अधिकारी/ अर्थ संकल्प व लेखा अधिकारी/ लेखा अधिकारी (परिव्यय) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **BL.OA.OL.** |
| ८. | अग्निश्मन केंद्र अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र |
| ९. | सहाय्यक अभियंता/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.OA.** |
| १०. | सहाय्यक अभियंता/ कनिष्ठ अभियंता (विवयां) | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.** |

# परिशिष्ट - " ३ "

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट -क" संवर्गातील पदांसाठी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तिंकरिता निश्चित केलेल्या आरक्षणाचे विवरणपत्र.

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| | **गट - क** | | | |
| १. | सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| २. | सहाय्यक | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| ३. | रोखपाल | अपात्र | अपात्र | पात्र **OA.OL.BL. MW.** |
| ४. | लिपीक टंकलेखक/ मंडळ निरिक्षक | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL. OAL. BL.** |
| ५. | स्वागतकार | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **OA.OL.BL.** |
| ६. | लघुलेखक (उच्चश्रेणी) | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| ७. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | पात्र **B.LV.** | अपात्र | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| ८. | लघु टंकलेखक | पात्र **B.LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL. OAL.** |
| ९. | सहाय्यक जनसंपर्क अधिकारी | पात्र **LV.** | अपात्र | पात्र **OA.OL.BL.** |
| १०. | भूमापक | अपात्र | अपात्र | पात्र **OA.OL.** |
| ११. | वरिष्ठ चित्रकार | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| १२. | आरेखक | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| १३. | सहाय्यक आरेखक | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| १४. | अनुरेखक | पात्र **LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| १५. | वरिष्ठ लेखापाल | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.OAL. BL.** |
| १६. | गाळणी निरिक्षक | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| १७. | उप अग्निशमन केंद्र अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र |
| १८. | प्रमुख अग्निशमन विमोचक | अपात्र | अपात्र | अपात्र |
| १९. | चालक यंत्रचालक | अपात्र | अपात्र | अपात्र |
| २०. | अग्निशमन विमोचक | अपात्र | अपात्र | अपात्र |
| २१. | तांत्रिक सहाय्यक | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OA.OL.BL.** |
| २२. | वाहनचालक | अपात्र | अपात्र | अपात्र |
| २३. | विजतंत्री | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| २४. | जोडारी | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| २५. | पंपचालक श्रेणी- २ | अपात्र | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |

# परिशिष्ट - " ४ "

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील "गट -ड" संवर्गातील पदांसाठी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तिंकरिता निश्चित केलेल्या आरक्षणाचे विवरणपत्र.

| अ.क्र | पदनाम | अंध/अल्पदृष्टी (१ %) | कर्णबधीर (१ %) | अस्थिव्यंग (१ %) |
|---|---|---|---|---|
| | | **गट - ड** | | |
| १. | खानसामा | पात्र **LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| २. | शिपाई | पात्र **LV./ B.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ३. | मदतनीस | पात्र **LV./ B.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |
| ४. | हमाल | पात्र **LV.** | पात्र **H.H.** | पात्र **OL.** |

**टिप :-**

**B.** = Blind ,
**LV.** = Low Vision ,
**H.H.** = Hearing Handicapped,
**OL.** = One Leg Affected,
**OA.** = One Arm Affected,
**OAL.** = One Arm and Leg Affected,
**BL.** = Both Legs Affected.
**MW** = Muscular Weakness.

9/9